Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401
Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 05/07/2025

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचण्या, आतल्या वाचण्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष

# प्रासादिक भाषाशैलीचे लेखक आनंद साधले



आत्माराम नीलकंठ ऊर्फ आनंद साधले यांचा जन्म ५ जुलै १९२० रोजी झाला. त्यांनी आपल्या जवळपास पंच्याहत्तर वर्षांच्या आयुष्यात साठ पुस्तकं लिहिली. 'आनंदध्वजाच्या कथा'मधून त्यांनी धीट भाषेत, पण प्रांजळपणे, शृंगाररसपूर्ण लिखाण केलं. महाभारताचा एका वेगळ्या पद्धतीनं परामर्श घेणारं 'हा जय नावाचा इतिहास आहे' हे त्यांचं पुस्तक गाजलं. 'आपल्या रोखठोक शैलीत त्यांनी महाभारतातल्या प्रमुख घटनांचं विश्लेषण केलं आहे. त्यांचं 'मातीची चूल' हे आत्मचरित्रही स्पष्ट आणि रोखठोक विवेचनामुळे चर्चिलं गेलं. लहान मुलांसाठी त्यांनी 'इसापनीती' आणि 'हितोपदेश'सारखी पुस्तकं लिहिली. 'नरेंद्र : रुक्मिणी स्वयंवर' हे नाटकही त्यांच्या नावावर आहे. 'शाकुंतल', 'मालविकाग्निमित्र', 'विक्रमोर्वशीय', 'मालती माधव', 'वेणीसंहार', 'मृच्छकटिक', 'मुद्राराक्षस' अशा प्रसिद्ध संस्कृत नाटकांचा अनुवाद साधले यांनी कादंबरीरूपात केला. 'शकुंतला', 'मालविका', 'ऊर्वशी', 'मालती', 'द्रौपदी', 'वसंतसेना', 'चाणक्य' अशी नावे त्यांनी कादंबऱ्यांना दिली.

'कुट्टनीमतम', 'अमरुशतक', 'गीतगोविंद' या काव्याचा त्यांनी गद्यात अनुवाद केला. याशिवाय त्यांनी अनेक संस्कृत विषयांवर लेख लिहिले आणि त्यांचे संग्रह प्रसिद्ध झाले. अनुवादित आणि आधारित असे हे जे साहित्य साधले यांनी निर्माण केले, त्यात त्यांची भावमधुर कविवृत्ती, सौंदर्यग्रही प्रकृती आणि आपली संपूर्ण श्रीकळा घेऊन अवतरलेली भाषाशैली मोहवून टाकते. त्यांची भाषा संस्कृतप्रचुर असली तरी प्रासादिक आहे. कोमल वर्णयुक्त असल्याने श्रुतिमधुर आहे. संस्कृतातील आशय स्पष्ट करण्याइतकी भावगर्भ आहे, रसार्द्र आहे. वाचकांवर ते संस्कृत, रसगंधी साहित्यफुलांचा नुसता सडा घालतात. संस्कृत साहित्याची ही सौंदर्यदालने मराठी वाचकांना उघडून दाखवण्याचे मोलाचे काम साधले यांनी केले आहे. आनंद साधले यांचे ४ एप्रिल १९९६ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Jul 05, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401